# कुडाळ जिल्हा परिषद गटात भाजपची ताकद वाढली

## सोमनाथ कदम यांच्या प्रवेशाने तिन्ही उमेदवारांचा विजय निश्चित

महाईन्यूज । सातारा

**सातारा जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या रणधुमाळीत कुडाळ जिल्हा परिषद गटात मोठी राजकीय उलथापालथ घडली आहे. कुडाळचे उपसरपंच सोमनाथ दादा कदम यांनी आपल्या समर्थकांसह भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केल्याने, या गटातील भाजपच्या तिन्ही उमेदवारांचे पारडे कमालीचे जड झाले आहे.**



सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूरचे पालकमंत्री ना. श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून सोमनाथ कदम यांनी हा निर्णय घेतल्याचे सांगण्यात येते.

त्यांच्या प्रवेशामुळे कुडाळ व सायगाव परिसरात भाजपची मजबूत तटबंदी उभी राहिली असून, विरोधकांसमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

### तिन्ही उमेदवारांना विजयाचा 'शब्द'

सोमनाथ कदम यांनी पक्षप्रवेशानंतर माध्यमांशी संवाद साधताना आपला संकल्प स्पष्ट केला. ते म्हणाले की, "कुडाळ जिल्हा परिषद गटाच्या विकासासाठी आणि शिवेंद्रसिंहराजे यांच्या हाताला बळकटी देण्यासाठी आम्ही भाजपमध्ये सामील झालो आहोत. कुडाळ जिल्हा परिषद गटाच्या उमेदवार सौ. जयश्रीताई सुहास गिरी, कुडाळ पंचायत समिती गणाचे उमेदवार श्री. सौरभ राजेंद्र शिंदे आणि सायगाव पंचायत समिती गणा उमेदवार सौ. चारुशिला विवेक पवार या तिन्ही उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करण्यासाठी आम्ही रक्ताचे पाणी करू."




"सोमनाथ दादा कदम यांच्या पक्षप्रवेशावर बोलताना पंचायत समिती गणाचे अधिकृत उमेदवार श्री. सौरभ राजेंद्र शिंदे म्हणाले की, "सोमनाथ दादांसारखा अनुभवी आणि जनमानसात मिसळणारा नेता आज भारतीय जनता पार्टीच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिला आहे, ही आमच्यासाठी मोठी जमेची बाजू आहे. त्यांच्या पाठिंब्यामुळे कुडाळ गणातील कार्यकर्त्यांमध्ये कमालीचा उत्साह आहे. आदरणीय ना. श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही जी विकासाची ध्येयधोरणे घेऊन लोकांसमोर जात आहोत, त्याला आता खऱ्या अर्थाने बळ मिळाले आहे. कुडाळचा सर्वांगीण विकास हेच आमचे एकमेव ध्येय असून, दादांच्या सोबतीने आम्ही हा गड मोठ्या मताधिक्याने सर करू, याची मला खात्री आहे."

– सौरभ राजेंद्र शिंदे, ७३ कुडाळ पंचायत समिती गण उमेदवार

### घरोघरी पोहोचणार 'कमळ'

"केवळ घोषणा देऊन थांबणार नाही, तर घराघरात जाऊन मतदारांशी संवाद साधू. प्रत्येक मतदाराला घराबाहेर काढून 'कमळ' चिन्हासमोरील बटन दाबण्यासाठी प्रवृत्त करू," असा ठाम विश्वास सोमनाथ कदम यांनी यावेळी व्यक्त केला. त्यांच्या या सक्रिय सहभागामुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य संचारले आहे.




### राजकीय गणिते बदलली

सोमनाथ कदम यांचा कुडाळ भागात दांडगा जनसंपर्क आहे. त्यांच्या भाजप प्रवेशामुळे स्थानिक पातळीवरील अनेक समीकरणे बदलली आहेत. मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या विकासकामांची शिदोरी आणि कदम यांची संघटनात्मक ताकद यामुळे कुडाळ गटात 'महायुती'चा आणि पर्यायाने भाजपचा विजय निश्चित मानला जात आहे.

"सर्वसामान्यांच्या हितासाठी सोमनाथ दादांचा निर्णय योग्य कुडाळ विकास सोसायटीच्या माध्यमातून काम करताना आम्हाला नेहमीच विकासाची ओढ राहिली आहे. सोमनाथ दादा कदम यांनी भाजपमध्ये प्रवेश करण्याचा जो निर्णय घेतला आहे, तो कुडाळ गटाच्या भविष्यासाठी अत्यंत आश्वासक आहे. ना. श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या माध्यमातून विकासकामांचा जो ओघ सुरू आहे, त्याला आता सोमनाथ दादांच्या खंबीर साथीमुळे मोठी गती मिळेल. सहकार क्षेत्रातील आणि ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांचे बळ आता भाजपच्या उमेदवारांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. हा प्रवेश केवळ राजकीय नसून कुडाळच्या सर्वांगीण प्रगतीची नांदी आहे."

- काशिनाथ शेवते, व्हाईस चेअरमन, कुडाळ विकास सोसायटी



"सोमनाथ दादा कदम यांचा भारतीय जनता पक्षामध्ये झालेला प्रवेश हा जावली तालुक्यातील पक्षाच्या बांधणीसाठी मैलाचा दगड ठरणार आहे. आदरणीय ना. श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली कुडाळ खोऱ्यात भाजपने आधीच मोठी मजल मारली आहे, त्यात आता दादांसारख्या मास लीडरची साथ मिळाल्याने या गटात विजयाचा केवळ सोपस्कार बाकी राहिला आहे. जावली भाजपचा सरचिटणीस म्हणून मला खात्री आहे की, कदम BLENDER संघटनात्मक कौशल्याचा फायदा तालुक्यातील इतर भागांतही होईल. आता 'कमळ' घराघरात पोहोचवून आम्ही तिन्ही उमेदवारांना ऐतिहासिक मताधिक्य मिळवून देऊ."

- पांडुरंग तरडे, सरचिटणीस, भारतीय जनता पार्टी, जावली तालुका